# ससून जनरल हॉस्पिटलमध्ये ५९ बेड असलेल्या अत्याधुनिक निओनॅटल सुविधेचे अनावरण

■ पुणे :

फिनोलेक्स इंडस्ट्रीज, तिचा सीएसआर भागीदार मुकुल माधव फाऊंडेशन आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट आज पुण्यातील बी. जे. सरकारी वैद्यकीय महाविद्यालय व ससून जनरल हॉस्पिटलमधील ५९ बेड्स असलेल्या अत्याधुनिक निओनॅटल (आसीयू)चे उद्घाटन करण्यासाठी एकत्र आले होते. हे निओनॅटल आयसीयू युनिट पूर्णपणे फिनोलेक्स इंडस्ट्रीज व श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट या दोहोंतर्फे प्रायोजित करण्यात आले आहे.

श्री. गिरिश बापट (पालक मंत्री, पुणे) आणि श्री. गिरिश महाजन (वैद्यकीय शिक्षण मंत्री) यांच्या हस्ते इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये या सुविधेचे उद्घाटन करण्यात आले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, पुणे यांनी १०,००० चौ.फूट क्षेत्रावर एनआयसीयूचे बांधकाम केले आहे. तर, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड व तिचा सीएसआर भागीदार मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) यांनी बेड्स, संगणक व इतर उपकरणांनी सुसज्जित असलेल्या सुविधेच्या काही भागाच्या बांधकामाकरिता आर्थिक योगदान दिले आहे.

निओनॅटल आयसीयू हे सर्व सुविधांनी युक्त असे लेव्हल-३ युनिट आहे. युनिटमध्ये टोटल पॅरेन्टेरल न्यूट्रिशन (टीपीएन), ह्युमन मिल्क बँक (एचएमबी), आरओपी स्क्रिनिंग व उपचार, तसेच दान करण्यात आलेले २ डी इको/ युएसजी व हिअरिंग सर्विसेस (ओएई मशिन) या सुविधांचा समावेश आहे. मातांसाठी आराम कक्ष व स्नान करण्याच्या खोल्यांची सुविधा आहे. नवजात बालकांमधील प्रीटर्म, बर्थ ॲस्फीक्सिया, आययुजीआर, मेकोनिया एस्पिरेशन सिंड्रोम, निओनॅटल जॉन्डिस या प्रकाराच्या विविध समस्यांवर उपचार करण्यासाठी हे एनआयसीयू उपयुक्त ठरेल. उपचार मोफतपणे (सर्फक्टॅन्ट सारख्या महागड्या औषधांसह) करण्यात येतील. एनआयसीयूमध्ये भरती करण्यात आलेल्या नवजात बालकांची उच्च दर्जाची काळजी घेण्याकरिता आणि सर्वोत्तम उपचार करण्याकरिता डॉक्टर व परिचारिकांची एक समर्पित, प्रशिक्षित टीम सेवेस सदैव उपलब्ध असेल.

ट्रस्टद्वारे करण्यात आलेल्या कार्यामधून प्रभावित होण्यासोबतच त्यामधून प्रेरणा घेत, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड व तिचा सीएसआर भागीदार मुकुल माधव फाऊंडेशन हे या प्रकल्पाशी संलग्न झाले. या डॉक्टरांना पुणे पुण्यातील प्रख्यात अशा केईएम एनआयसीयू या आमच्या केंद्रात डॉ. उमेश वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली, तर भारतीय विद्यापीठातील डॉ. प्रदीप सुर्यवंशी यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण व कौशल्य वृद्धिंगत करण्याची सुद्धा संधी एमएमएफ देते.



कार्यक्रमाप्रसंगी बोलताना, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष, श्री. अशोक गोडसे म्हणाले, ''आम्ही ससून जनरल हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक किचनची रचना केली आहे आणि या किचनमधून आम्ही प्रत्येक रुग्णाला मोफतपणे दोन वेळच्या जेवणाची सुविधा देतो. याव्यतिरिक्त, आम्ही पाच गायनॅक वार्डस् आणि रुग्णांच्या नातेवाईकांसाठी आराम कक्षांचे योगदान दिले आहे. तसेच, आम्ही हॉस्पिटलला पुणे शहरासाठी दोन रुग्णवाहिकांची सेवा दिली आहे.''

या प्रसंगी बोलताना, हॉस्पिटलचे डीन, डॉ. अजय चंदनवाले म्हणाले; ''मुख्यत:, मध्यमवर्गीय समाजासाठी ससून जनरल हॉस्पिटलची सेवा सक्षम करणे आणि कॉर्पोरेट हॉस्पिटल्सनुसार सुविधा देणे, हा या सुविधेमागील मुख्य हेतू आहे.''

या प्रसंगी बोलताना, मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त, श्रीमती. रितू छाब्रिया म्हणाल्या, ''ही तर फक्त सुरुवात आहे. अजून, आरोग्य व कल्याणच्या क्षेत्रामध्ये बरेच काही करण्याचे बाकी आहे. आमच्या या थोर उपक्रमाला योगदान देण्याकरिता ेउशदेणगीदार व उदारमतवादींचे स्वागत आहे. सर्वांसाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या आमच्या या प्रवासाशी संलग्न होण्याकरिता वैद्यकीय क्षेत्रामधील लोकांचे देखील स्वागत आहे. उत्सुक व्यक्ती मुकुल माधव फाऊंडेशनशी ीज्ञीश्रारवहरीशवळषषारळश्र.लो येथे संपर्क साधू शकतात.''

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड व तिचा सीएसआर भागीदार मुकुल माधव फाऊंडेशन यांनी सर्वांच्या अधिकाधिक भल्यासाठी नेहमीच विद्यमान सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर विश्वास ठेवला आहे आणि हे निओनॅटल आयसीयू हे त्याचाच आणखी एक पुरावा आहे.

**मुकुल माधव फाऊंडेशन बाबत:**

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड (एफआयएल) तिचा सीएसआर भागीदार मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ)च्या माध्यमातून तिचे सर्व सीएसआर उपक्रम राबविते. १९९९ मध्ये एमएमएफची पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट म्हणून नोंदणी करण्यात आली आहे आणि तेव्हापासून ते गरजू व्यक्तींना मुख्यत: शिक्षण, आरोग्य व सामाजिक कल्याण या क्षेत्रांमध्ये सहाय्य देण्याकरिता कार्य करत आलेले आहेत.

२००८ मध्ये, त्यांनी फिनोलेक्स इंडस्ट्रीजसह सहयोगाने रत्नागिरी जिल्ह्यामधील गोलप गावाच्या परिसरामध्ये मुकुल माधव विद्यालय ही इंग्जी माध्यमाची शाळा सुरू केली. आज, तेथे अनुदानित खर्चामध्ये ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळते.